REGISTERED No. B. 3434

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १६ पुणें, बुधवार तारीख ४ आक्टोबर, १९५० अंक ४०


## दि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

९ बँक हाऊस लेन, कोट, मुंबई,
स्थापन साल १९११

चेअरमनः—श्री. आर. जी. सरैय्या, ओ. बी. ई.

| | |
|---|---|
| भागांचें भांडवल | रु. ४८,२६,००० |
| गंगाजळी फंड | रु. ३३,४१,००० |
| ठेवी | रु. ८,६९,९७,००० |
| खेळतें भांडवल | रु. १०,४३,९३,००० |

### १५ जिल्ह्यांत ६५ शाखा

हिंदी संघामधील महत्त्वाच्या शहरांमधून हुंड्या, बिलें वगैरे वसूल केलीं जातात. वेगवेगळ्या प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. त्यांच्या शर्तींबद्दल चौकशी करावी.

व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.

( मिरज येथें १९२९ सालीं स्थापन झालेली भागीदारांची जबाबदारी मर्यादित )

## दि मिरज स्टेट बँक लि.

—मिरज—
शेड्यूल्ड बँक

( स्थापना : १९२९ )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... | रु. २५,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें ... | रु. १२,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड ... | रु. ५,७०,००० |
| एकूण खेळतें भांडवल ... | रु. ७०,००,००० |

शाखा

★ लक्ष्मेश्वर ( जि. धारवाड )
★ कुर्डूवाडी, पंढरपूर व अकलूज ( पे ऑफिस )

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. सरकारी रोखे, शेअर्स, सोनें, माल, स्थावर मिळकत वगैरेंचे तारणावर कर्ज अगर कॅश क्रेडिट दिलें जातें. समक्ष चौकशी बँकेकडे करावी अगर लिहावें.

डॉ. कृ. गो. गोसावी, चेअरमन.
के. डी. शिराळकर मॅनेजर

## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

( शिड्यूल्ड बँक )

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २.

| | |
|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. ७,१८,२६५ |
| खेळतें भांडवल | रु. ७१,००,००० |

मुंबई शाखाः—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.
श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर.

**दळणाच्या चक्क्या-टूल ग्राइंडर्स**
**मशीन टूल्स**
**कडबा कापण्याचीं यंत्रें—करवत मशीन्स.**
या मालाबद्दल आमचेकडे चौकशी करण्यास विसरूं नका.
**केळकर बंधू, लक्ष्मी रोड, पुणें शहर.**

# विविध माहिती

**दांत नसले तरी चालतील**—अमेरिकन लष्करांत भरती करण्यांत येणाऱ्या लोकांना दांत नसले तरी आतां चालेल. १९४८ पासून ह्यासंबंधीं असा नियम होता कीं, सैनिकाला आठ वरचे आणि खालचे आठ दांत असलेच पाहिजेत. लष्करांत भरती होणाऱ्या लोकांची संख्या वाढावी म्हणून वरील नियम रद्द करण्यांत आला आहे. मुळीच दांत नसलेल्या अमेरिकन सैनिकांनासुद्धा लष्करातर्फे दांत बसवून घेतां येतील.

**कामगार डायरेक्टर झाला**—दिल्ली येथील श्रीराम टेक्स्टाइल गिरणीच्या डायरेक्टर बोर्डावर राधेश्याम नांवाच्या एका कामगाराला डायरेक्टर म्हणून घेण्यांत आलें आहे. गिरणीच्या घटनेंत मजुरांचा एक प्रतिनिधी घेण्याची व्यवस्था केलेली आहे. ह्या कामगारानें इतर दोन प्रतिनिधींचा मतदानांत पराभव केला.

**तंबाकूची निर्यात**—अमेरिकेंतील तंबाकूच्या किंमती वाढूं लागल्यामुळें भारतामधील तंबाखूला ब्रिटनकडून अधिक मागणी येईल असा अंदाज आहे. गेल्या वर्षी भारतानें ब्रिटनला ३८,३,४१,७१७ पौंड वजनाची तंबाखू निर्यात केली. तिची किंमत ५६,१४,१९५ पौंड झाली. चालू वर्षी आतांपर्यंत ब्रिटननें भारताकडून २,८०,००,००० पौंड वजनाची तंबाखू घेतली आहे. इंग्लंडला लागणाऱ्या उच्च दर्जाची तंबाखू भारत पुरवूं शकेल असा तज्ज्ञांचा अंदाज आहे.

**हंगेरींत रशिअन शेतकी-तज्ज्ञ**—हंगेरींतील उत्पादकांच्या सहकारी संस्थांची संख्या वाढविण्यासाठी काय उपाय करावे ह्या संबंधीं सल्ला देण्यास ५२ रशियन शेतकरी नुकतेच हंगेरींत गेले आहेत. हंगेरींतील २०० शेतकऱ्यांचें एक मंडळ रशियांत सहकारी शेती पहाण्यासाठी गेलें होतें. तें परत आल्यावर हंगेरींतील १५,००० शेतकऱ्यांनीं उत्पादनाच्या सहकारी संस्थांत दाखल होण्याचा निर्णय घेतला.

**मुंबई स्टेट ट्रान्सपोर्ट**—मुंबईहून हैदराबादला व म्हैसूरला जाणाऱ्या प्रवाशांच्या सोयीसाठी मुंबई स्टेट ट्रॅन्सपोर्ट व्यवस्था करणार आहे असें समजतें. सध्यां मुंबई-म्हैसूर रस्त्यावरील हुबळीपर्यंत आणि मुंबई-हैदराबाद रस्त्यावरील सोलापूरपर्यंतच मोटारी जातात. ह्यासंबंधीं म्हैसूर आणि हैदराबाद सरकारशीं लवकरच वाटाघाटी सुरू करण्यांत येणार आहेत.

**दुष्काळी राज्यांना देणगी**—इंडियन फॅमिन ट्रस्ट ह्या संस्थेनें बिहार आणि पंजाब ह्या राज्यांना दुष्काळी परिस्थितीला तोंड देतां यावें म्हणून प्रत्येकीं २०,००० रु. ची रक्कम मंजूर केली आहे. भारताचे अन्नमंत्री श्री. मुनशी ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या ट्रस्टच्या बैठकींत ही मदत देण्याचें ठरलें.

**बंगालमधील यांत्रिक मागाचे कारखाने**—यांत्रिक मागावर कापड काढणाऱ्या बंगालमधील १७ गिरण्या सुताच्या तुटवड्यामुळें बंद पडण्याचा धोका उत्पन्न झाला आहे. ह्या सर्व गिरण्यांतून मिळून १,२०० माग आहेत. कारखान्यांत काम करणाऱ्या कामगारांची संख्याही मोठी आहे. सर्व गिरण्यांतून मिळून दर महिना १५,००,००० वार कापड तयार होतें.

**सार्वजनिक कामासाठी सक्ति करणारें बिल**—संयुक्त प्रांत सरकारनें खेड्यांतील प्रत्येक कुटुंबानें दरवर्षी आपले कांहीं तास सार्वजनिक कामासाठीं दिले पाहिजेत अशी सक्ति करणारें बिल विधिमंडळांत मांडण्याचें ठरविलें आहे. बिलाचें कायद्यांत रूपांतर झाल्यास रस्ते करणें, विहिरी खणणें, इत्यादि कामासाठीं खेड्यांतील कुटुंबांना मोफत काम करावें लागेल.

**टॉलस्टॉय- महात्मा गांधी पत्रव्यवहार**—सुप्रसिद्ध रशियन तत्त्वज्ञानी मि. टॉलस्टॉय ह्यांचा ४० वा श्राद्धदिन रशियांत साजरा होणार आहे. त्या प्रसंगीं महात्मा गांधी आणि टॉलस्टॉय ह्यांच्यांत झालेल्या पत्रव्यवहाराच्या पुस्तकाची एक प्रत रशियांत धाडण्यांत येणार आहे. सदर प्रत टॉलस्टॉयच्या कबरस्तानानजिक ठेवण्यांत येईल.

**२ पैशांच्या नाण्याची ३०० रु. किंमत**—सुरतेमधील एका कॉलेज विद्यार्थ्यानें आसाम- मदत फंडाच्या पेटींत अवघे २ पैसे टाकले. ह्या २ पैशाच्या नाण्याचा लिलांव करण्यांत आला. त्या वेळीं त्याची किंमत ३०० रु. आली व फंडांत तेवढ्या अधिक रकमेची भर पडली.

**सांठा उजेडांत आणण्यासाठी बक्षिस**—गैरकायदा करण्यांत आलेले धान्याचे सांठे सांपडून देण्यास उपयोगी पडेल अशी माहिती देणारास बक्षिसें देण्याचें बिहार सरकारनें जाहीर केलें आहे. अशा दर मण धान्यामागें माहिती देणारास ४ आणे देण्यांत येणार आहेत.

**इटलींत जमिनीची वांटणी**—इटलीच्या सरकारनें जमीन नसणाऱ्या शेतकरी कुटुंबांना बड्या जमीनदारांच्या जमिनी वाटून देण्याची मोहीम सुरू केली आहे. ३,००० एकर जमीन नुकतीच चिठ्ठ्या टाकून वाटण्यांत आली. येत्या अडीच वर्षांत २,५०,००० शेतकरी कुटुंबांना २६,४०,००० एकर जमीन वाटून देण्यांत येणार आहे.

**प्रेक्षणीय स्थान पहाण्याची सोय**—रांचीजवळील सुप्रसिद्ध 'हुंड्रु' चा धबधबा पहाण्याची सोय करण्याचें बिहार सरकारनें ठरविलें आहे. भारतांत येणाऱ्या परकीय प्रवाशांना सोयी उपलब्ध करून देण्याचें भारत सरकारचें धोरण आहे. ह्यास अनुसरून वरील योजना आखण्यांत आली असावी.

**बंगालमधील निवडणुकीचा खर्च**—प. बंगालमधील सार्वत्रिक निवडणुकींत मतदारांच्या याद्या तयार करण्यास सुमारें १० लाख रु. खर्च येणार आहे. त्यापैकीं निम्मा खर्च मध्यवर्ती सरकारनें देण्याचें कबूल केलें आहे असें समजतें.

**उत्तर चंपारण्याची भूगर्भ परीक्षा**—उत्तर चंपारण्यांत कोळसा व चुनखडीचे दगड सांपडतात किंवा काय हें पहाण्यासाठी त्या भागाची भूगर्भपरीक्षा करण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे.

**काश्मीरमध्यें उसाची लागवड**—काश्मीरमध्यें प्रयोग म्हणून तीन ठिकाणीं उसाची लागवड करण्यांत आली आहे. दक्षिण भारतांतील सर्वांत उत्तम प्रतीचा ऊंस लागवडीसाठी निवडण्यांत आला असून तो आतां ९ फूट उंच वाढला आहे.

—सर्व प्रांतांतील—
सुती-गरम-रेशमी
—खादीचें माहेरघर—
**खादी मन्दिर**
२६१, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २.

# अर्थ

बुधवार, ता. ४ आक्टोबर, १९५०



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

## परदेशी भांडवल भारतांत कां येत नाहीं ?

न्यूयॉर्क विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट ऑफ इंटर नॅशनल फिनॅन्सनें "भारताची आर्थिक परिस्थिति" ह्या नांवाचें एक बुलेटिन प्रसिद्ध केलें आहे. त्यांत, येथील आर्थिक परिस्थितीचा विस्तृत आढावा घेण्यांत आला आहे. स्वतंत्र भारताच्या पहिल्या तीन वर्षांत त्याला अनेक संकटांना तोंड द्यावें लागलें, तरी कांहीं बाबतींत त्यानें इष्ट प्रगति केली आहे अशी प्रस्तावना करून, बुलेटिनमध्यें भारताचा परराष्ट्रीय व्यापार, देणें–घेणें, परदेशीय भांडवलाबाबत सरकारी धोरण, इत्यादींबाबत चर्चा केली आहे.

भारताचें अन्नपुरवठ्यासंबंधीं परदेशांवरील अवलंबन दूर व्हावें आणि राष्ट्रीय उत्पादन वाढावें ह्यासाठी शेती आणि उद्योगधंदे ह्यांच्या उत्कर्षाच्या अनेक भव्य योजना सरकारनें आखल्या आहेत. त्या पार पाडण्यासाठी फार मोठें भांडवल आवश्यक असून तज्ज्ञांचाहि तुटवडा आहे. परदेशांकडून ह्या गोष्टी मिळविल्याविना सरकारी योजना हातीं घेतल्या जाणें किंवा त्या पार पडणें अशक्यप्रायच आहे. आंतरराष्ट्रीय बँकेकडून एखादें दुसरें मोठें कर्ज मिळालें तरी तेवढ्यानें व्यापक प्रश्न सुटण्याजोगा नाहीं. भारताची भांडवलविषयक गरज इतकी मोठी आहे, कीं परदेशीयांना येथें आपलें खाजगी भांडवल गुंतविण्यास आकर्षणें सरकारला क्रमप्राप्तच झालें. हें भांडवल येण्याची शक्यता मुख्यतः अर्थात् अमेरिकेकडूनच आहे. परकीय भांडवलाची व परकीय नेतृत्वाची भारतास गरज असल्याचें भारत सरकारनें मागेंच कबूल केलेलें आहे. जीं बंधनें हिंदी उद्योगधंद्यांवर घालण्यांत येणार नाहींत, अशीं कोणतींहि बंधनें विदेशी उद्योगधंद्यांवर घातलीं जाणार नाहींत, हें सरकारनें स्पष्ट केलें आहे. भारतांत गुंतविलेलें परकीय भांडवल किंवा त्यावरील व्याज हीं भारताबाहेर नेण्याचे संबंधांतहि सरकारनें सवलती दिलेल्या आहेत. कंपन्यांची सक्तीनें खरेदी केली गेली तर योग्य ती भरपाई केली जाईल, असेंहि सरकारचें आश्वासन आहे. भारताच्या हितास बाधक अशा गोष्टी सरकार अर्थातच करूं देणार नाहीं. तज्ज्ञांचे नेमणुकीचे बाबतींत सरकारचा हिंदीकरणाचा आग्रह असला तरी त्यांत लवचीकपणा मुद्दामच ठेवण्यांत आलेला आहे.

सरकारचें हें धोरण अवास्तव उदार आहे, अशी त्यावर त्यावेळीं टीका झालेली होती. असें असतांना, परदेशी भांडवलाचा ओघच्या ओघ भारताकडे वहावयास हवा होता. परंतु, तसें कांहींच घडलेलें नाहीं. अमेरिकन भांडवलदारांना हिंदी सरकारनें देऊं केलेल्या सवलती पुरेशा आकर्षक वाटत नाहींत, असा बुलेटिनचा अभिप्राय आहे. परदेशी कंपन्यांचें राष्ट्रीयीकरण करण्याचे वेळीं द्यावयाची नुकसानभरपाई कोर्टानें ठरवावी, विधिमंडळानें नव्हे, असा त्याचा आग्रह आहे. हळूहळू उद्योगधंद्यांत भारतीयांचाच मुख्य हात रहावा ही हिंदी सरकारची इच्छाहि अमेरिकन भांडवलदारांना जाचक वाटत आहे. करविषयकहि कांहीं अडचणी पुढें करण्यांत आल्या आहेत. खरें पाहिलें, तर भारतांत भांडवल न गुंतविण्यांसाठी पुढें केलेल्या ह्या सर्व सबबी असून, खरें कारण कांहींतरी दुसरेंच असलें पाहिजे, अशी शंका येते. अमेरिकन भांडवलदारांना भारताच्या औद्योगिक क्षेत्रांतील मोठा थोरला भाग सहज व्यापता यावा, अशी वास्तविक आजची परिस्थिति आहे. हिंदी सरकारचें आर्थिक धोरण त्याच्या आड येत नसून, येथें भांडवल गुंतविणें त्यांना किफायतशीर वाटत नाहीं, हेंच खरें आहे. भारतामध्यें मोटारी, सायकली, टाइपरायटर्स, रेडिओ, टायर्स, इत्यादींचे कारखाने आज काढले तरी त्यांतील उत्पादन ह्यापुढें मोठा नफा देत राहील अशी स्थिति नाहीं. हिंदी आर्थिक स्थितीचा दर्जा अत्यंत निकृष्ट असल्याकारणानें, हिंदी जनतेची क्रयशक्तीहि फारच मर्यादित आहे आणि ती वाढल्यानंतरच औद्योगिक मालाचा खप होणार. मोठालीं धरणें बांधून शेतीला पाणीपुरवठा करणें व स्वस्त वीज उपलब्ध करणें, वहातुकीच्या सोयी वाढविणें, खाणींचें उत्पादन सुधारणें आणि मूलभूत महत्त्वाचे औद्योगिक उपक्रम करणें ह्यांस आज भारतांत प्रधान महत्त्व आहे. ह्या मार्गानें गेल्यानंतरच, इतर उद्योगधंद्यांना वाव निर्माण होणार आहे. ह्या अग्रस्थानीं असलेल्या सुधारणांचें फळ रोख नफ्याच्या स्वरूपांत मिळणारें नसून इतर उद्योगधंद्यांच्या वाढीस पोषक परिस्थिति निर्माण करण्याची त्यांची कामगिरी अप्रत्यक्ष अर्थोत्पादन करणार आहे. अर्थात्, अशा उपक्रमांत भांडवल गुंतविण्यास खाजगी भांडवलदार तयार होणार नाहींत आणि वर सांगितल्याप्रमाणें, इतर कारखान्यांत मोठालें भांडवल गुंतविण्यांत परदेशीयांना आकर्षण वाटावें इतकी त्यांत किफायत नाहीं. तेव्हां अमेरिकन भांडवल भारतांत येत नाहीं ह्याचें खरें कारण त्या भांडवलावर पुरेसें व्याज व नफा हीं सुटण्याजोगीं नाहींत हेंच आहे आणि त्या बाबतींत हिंदी सरकार कांहींच करूं शकणार नाहीं. हिंदी उत्पादनशक्ति वाढविण्याचें प्राथमिक कार्य करण्यासाठी स्वदेशी भांडवल पुरणार नाहीं, परदेशी खाजगी भांडवल येणार नाहीं आणि इंटर नॅशनल बँकेसारख्या संस्थांचीं कर्जेंहि अगदीं अपुरीं पडतील. भारताला आज व्याजाच्या व परतफेडीच्या कर्जांपेक्षा परदेशीय देणग्यांची अधिक आवश्यकता आहे !

---

**हिंदी काड्याच्या पेट्यांवर पाकिस्तान नाखूष**—भारतांत तयार झालेल्या काड्याच्या पेट्या पाकिस्तानांत खपेनाशा झाल्या आहेत असें समजतें. ह्या काड्याच्या पेट्या स्वीडन, नॉर्वे, झेकोस्लोव्हाकिआ व इटली ह्या देशांतील पेट्यांपेक्षा कमी प्रतीच्या असतात असें पाकिस्तानी व्यापाऱ्यांचें मत आहे.

**कापसाच्या लागवडीवरील नियंत्रण उठणार**—अमेरिकेंतील यंदाचें कापसाचें उत्पादन १ कोटी गाठींपेक्षाही कमी आहे. गेल्या वर्षीं १,६१,२८,००० गाठीं कापूस पिकला होता. अमेरिकेंतील कापसाचीं गुदामें जवळ जवळ रिकामीच झालीं आहेत. अशा परिस्थितींत पुढील वर्षीं कापसाच्या लागवडीवरील आणि तो बाजारांत आणण्याच्या बाबतींतील सर्व बंधनें रद्द करण्यांत येतील असें म्हणतात.

**सक्तीचें लष्करी शिक्षण**—उत्तर प्रदेशाच्या १७ जिल्ह्यांतील २०,००० कॉलेजच्या विद्यार्थ्यांना सक्तीचें लष्करी शिक्षण देण्यांत येत आहे.

## बँक ट्रायब्यूनलच्या निवाड्याविरुद्ध अपील

इंपीरिअल बँक, बँक ऑफ इंडिया, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ बरोडा आणि इंडियन बँक (मद्रास) ह्यांनीं सुप्रीम कोर्टाकडे अर्ज करून, राज्यघटनेच्या १३६ व्या कलमानुसार ऑल इंडिया इं. ट्रायब्यूनल (बँक्स) च्या निवाड्याविरुद्ध अपील करण्याची खास परवानगी मागितली आहे. तो अर्ज शुक्रवार दि. २९ सप्टेंबर रोजीं सुनावणीस निघाला. बँकांच्या वतीनें डॉ. बक्षी टेक चंद ह्यांनीं खालील मुद्दे मांडले:– (१) ट्रायब्यूनलनें आपल्या अधिकारक्षेत्राबाहेर जाऊन निवाडा केला आहे आणि इंडस्ट्रिअल डिस्प्यूट्स ॲक्टांतील तरतुदींचा चुकीचा अर्थ लावला आहे. उदाहरणार्थ, इं. डि. ॲक्टांतील कलम २ (S) मधील 'वर्कमन' हा शब्द 'ऑफिसर्स' ना लागू करण्यांत आणि 'एनी पर्सन' ह्या शब्दाचा अर्थ लावण्यांत ट्रायब्यूनलें आपल्या अधिकाराचें अतिक्रमण केलें आहे. वर्कमेन आणि एम्प्लॉयर्स म्हणजे कामगार आणि त्यांना नेमणारे मालक हेच फक्त तंट्याचे उभय पक्ष होऊं शकतात. 'एनी पर्सन' म्हणजे कोणताहि मनुष्य ह्याचा अर्थ तो कामगार नसला तरी चालेल, असें मानल्यानें बिगर-कामगार वर्गांतील बँक अधिकारीहि औद्योगिक तंट्याच्या कक्षेत ओढले गेले आहेत. (२) बँकांनीं जाहीर केलेल्या डिव्हिडंडच्या ठराविक प्रमाणांत त्यांनीं बोनस द्यावा, हा ट्रायब्यूनचा निर्णय बँकिंग कंपनीज ॲक्टांतील कांहीं तरतुदींशीं विसंगत होत आहे. बोनस डिव्हिडंडवर अवलंबून ठेवल्यानें, कामगारांना बँकांच्या नफ्यांत अप्रत्यक्ष रीतीनें वांटा दिला जात आहे, परंतु असें करण्यास बँकिंग कंपनीज ॲक्टानें [१० (१) (बी) (II) हें कलम ५० व्या कलमाशीं जोडून वाचलें असतां] मनाई केलेली आहे.

बँक नोकरांच्या एका युनियनच्या प्रतिनिधीनें सांगितलें कीं, अधिकारी आणि इतर नोकर ह्यांत कांहींच फरक नाहीं; अधिकारी हे केवळ "गौरवलेले कारकून" होत.

मंगळवार, दि. ३ पर्यंत अर्जाचें काम तहकूब झालें.

### बँक नोकरांचा बेमुदत संप ?

बँक ऑफ बरोडा एम्प्लॉईज युनियन, मुंबई, च्या जनरल बॉडीची सभा ३ ऑक्टोबर १९५० रोजीं भरणार होती. "बँक ट्रायब्यूनलच्या निवाड्याप्रमाणें बँक ऑफ बरोडा पगार देत नाहीं; जुन्या स्केलप्रमाणेंच बँकेनें पगार दिला आहे. अवार्डच्या प्रसिद्धीपासून ३० दिवसांच्या आंत बँकांनीं अवार्डप्रमाणें पगार देण्यास प्रारंभ केला पाहिजे, असा नियम अवार्डनें केला तरी सुद्धां बँक तो मानीत नाहीं. तेव्हां आतां बेमुदत संप करावा कीं काय ह्याचा विचार करणें नोकरवर्गास क्रमप्राप्त झालें आहे." अशा अर्थाचें पत्रक युनियनच्या सेक्रेटरीनें काढलें आहे.

(पगाराच्या व भत्त्याच्या श्रेणी अ दर्जाच्या बँकांवर निवाड्याच्या प्रसिद्धीच्या तारखेच्या आधीं सहा महिन्यांपासून बंधनकारक होणार आहेत. व दर्जाच्या बँकांस निवाड्याच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून निवाडा बंधनकारक होईल. बाकीच्या म्हणजे क दर्जाच्या बँकांना प्रसिद्धीच्या तारखेनंतर सहा महिन्यांनीं तो लागू होईल. अ =२५ कोटी रु. खेळतें भांडवल. ब=७½ ते २५ कोटी रु. खेळतें भांडवल. क= इतर बँका—सं. अर्थ)

### सोलापूर बँकेची देणगी

सोलापूर डि. सें. को. बँक लि. नें पुणें विद्यापीठास ५,००० रु. ची देणगी जाहीर केली आहे.

### साखर चौकशी समितीच्या प्रश्नावलीस उत्तरें पाठविण्याच्या मुदतींत वाढ

निरनिराळ्या संस्था, कारखानदार व व्यापारी यांची विनंति लक्षांत घेऊन साखर चौकशी समितीनें २ सप्टेंबर, १९५० रोजीं काढलेल्या प्रश्नावलीस उत्तरें पाठविण्याची शेवटची मुदत १५ ऑक्टोबर १९५० पर्यंत वाढविली आहे. १९५० च्या 'शुगर क्रायसिस एन्क्वायायरिंग अथॅारिटी वटहुकुमान्वयें संबंधित संस्थांनीं २५ सप्टेंबर १९५० पर्यंत उत्तरें पाठवावयाचीं होतीं. अधिक मुदतवाढ यापुढें करण्यांत येणार नसून उत्तरें चिटणीस, साखर चौकशी समिति, सेंट्रल सेक्रेटरिएट, नवी दिल्ली यांजकडे १५ ऑक्टोबर १९५० पर्यंत पाठविण्यांत यावीत.

### उसाच्या लागवडींत ४·७% वाढ

भारतांत १९५०–५१ मध्यें उंसाची लागवड ३६,१४,००० एकर जमिनींत झाली असावी असें मध्यवर्ती सरकारच्या शेती खात्याच्या अर्थ व आंकडेवारी विभागाच्या पहिल्या अंदाजावरून समजतें. हाच आंकडा १९४९–५० मध्यें ३४,५१,००० हजार एकर असा होता. म्हणजे या वर्षीची लागवड ४·७ टक्क्यांनीं जास्त आहे. ही वाढ केवळ उत्तर प्रदेश राज्यांत झाली आहे. १९४८–४९ शीं तुलना करतां १९४९–५० मध्यें या राज्यांतील लागवडींत ३ लाख एकरांची घट झाली होती. १९५०–५१ मध्यें झालेल्या वाढीची याचेशीं तुलना केल्यास १९४९–५० मधील घट या वर्षी भरून निघाली आहे असें म्हणतां येईल.

### ठेवी घेण्यास बंदी

दिनाजपूर बँकेनें मंगळवार, दि. ३ ऑक्टोबरपासून नव्या ठेवी घेण्याचें बंद करावें, असें रिझर्व्ह बँकेनें त्या बँकेस कळविलें आहे. रिझर्व्ह बँक कायद्याच्या ४२ व्या कलमाप्रमाणें कांहीं किमान रकम तिचेकडे ठेवावी लागते, ती वेळोवेळ तंबी देऊनहि त्या बँकेनें न ठेवल्यापुळें, रिझर्व्ह बँकेला हा ठेवी-बंदीचा हुकूम द्यावा लागला आहे. दिनाजपूर बँकेची स्थापना १९१४ सालाची असून ती शेड्यूल्ड बँकांच्या यादींत होती.

### भद्रावती कारखान्याचा विकास

म्हैसूर सरकारच्या मालकीच्या, भद्रावती येथील आयर्न ॲण्ड स्टील वर्क्सच्या विस्ताराच्या योजनांची बरीच प्रगति झाली आहे. लवकरच, उत्पादन चौपटीनें वाढेल. त्यासाठीं ४ कोटी रुपयांचा भांडवली खर्च लागेल.

### घरें तयार करणारा कारखाना

सरकारी मालकीचा, दिल्ली येथील घरें तयार करणारा कारखाना आतां दररोज प्रत्येकीं दोन खोल्यांचीं पांच घरें बनवूं लागला आहे. ३० इंजिनिअर्स आणि ३०० कामगार कारखाना २४ तास चालू ठेवीत आहेत. लवकरच दररोज १५ घरें तयार होऊं लागतील.

### दुर्लभ चलनाचें सुलभ चलन झालें.

आतांपर्यंत दुर्लभ चलनाचे म्हणून मानले जाणारे बेल्जियम आणि पश्चिम जर्मनी हे देश यापुढें सुलभ चलनाचे विभाग मानले जातील असें जाहीर करण्यांत आलें आहे.

# चेकचें कलेक्शनः नातें एजंटाचें का ट्रस्टींचें ?

## बँक ऑफ इंडिया वि. नॅ. सि. बँकेचा लिक्विडेटर

### मुंबई हायकोर्टाचा निर्णय

दि नॅशनल सिक्युरिटी बँक लि. ची मुख्य कचेरी मुंबई येथें होती. तिची एक शाखा तळोद येथें होती. धेणेकऱ्याच्या अर्जावरून बँकेच्या सक्तीच्या वाइंडिंग अपचा हुकूम दि. २१ फेब्रुवारी १९४७ रोजीं हायकोर्टानें दिला. दि बँक ऑफ इंडियांच्या खातेदाराचे अनुक्रमें १, २ व २ हजारांचे असे तीन चेक नॅ. सि. बँकच्या तळोद शाखेवर काढलेले होते. हे चेक बँक ऑफ इंडियानें वसुलीसाठीं नॅ. सि. बँकेच्या स्वाधीन केले. ते योग्य प्रकारें तळोद शाखेकडे वसुलीसाठी पाठविण्यांत आले. खातेदारांच्या नांवें रकमा टाकून तळोद शाखेनें मुख्य कचेरीच्या खातीं त्या जमा केल्या आणि क्रेडिट नोटस् मुख्य कचेरीकडे पाठविल्या. पहिल्या चेकची रक्कम १५ फेब्रुवारी १९४७ रोजीं व बाकीच्या दोन चेक्सची रक्कम २१ फेब्रुवारी १९४७ रोजीं क्रेडिट करण्यांत आली. क्रेडिट नोटस् मुख्य कचेरीच्या हातीं २१ फेब्रुवारी रोजीं वाइंडिंग अपचा हुकूम झाल्यावर हातीं पडल्या. लिक्विडेशनच्या कामाचे वेळीं बँक ऑफ इंडियानें खालीलप्रमाणें हाय कोर्टाकडे मागणी केली.

(१) १, २ व २ हजार याप्रमाणें एकूण ५ हजार रुपये वाइंडिंग अपच्या हुकुमाचे अगोदरच व हुकुमाचे दिवशीं बँक ऑफ इंडियाच्या मालकीचे होते; ही रक्कम नॅ. सि. बँकेच्या जिंदगीचा भाग नव्हता. ऑफिशियल लिक्विडेटरच्या आणि बँकेच्या लिक्विडेटरच्या अधिकारांत ती रक्कम नव्हती.

(२) ही ५ हजारांची रक्कम बँक ऑफ इंडियास देण्याचा हुकूम ऑ. लिक्विडेटरला व नॅ. सि. बँकेच्या लिक्विडेटरला देण्यांत यावा.

बँक जेव्हां चेकची वसुली करते, तेव्हां ती वसुली होल्डर फॉर व्हॅल्यू या नात्यानें करील किंवा केवळ वसूलदार म्हणजे होल्डरचा एजंट या नात्यानें करील. या प्रकरणांत बँक ऑफ इंडियाचें नॅ. सि. बँकेंत खातें नव्हतें, तेव्हां हा प्रश्न उद्‌भवलाच नाहीं. बँकेकडे कलेक्शनाला चेक धाडतांना बँक ऑफ इंडियानें खालीलप्रमाणें पत्र जोडलें होतें:—

"आम्हीं सोबत तुमच्या बँकेवरील......रु. चा चेक कलेक्शनसाठीं पाठवीत आहों. तुमचे चार्जेस वजा करून, त्याची रक्कम मुंबईंतील एकाद्या बँकेवर आमच्या नांवें चेक काढून पाठवावी."

याचा सरळ अर्थ होतो, कीं बँक ऑफ इंडियाचा एजंट या नात्यानेंच नॅ. सि. बँक वागली. परंतु, ऑफिशिअल लिक्विडेटरचें म्हणणें असें, कीं चेकच्या रकमेची जिंदगी बँकेस मिळालीच नाहीं. फक्त एका शाखेतून दुसऱ्या शाखेंत वर्गावर्गी झाली. दुसरें असें कीं, चेकचें कलेक्शन, क्रेडिट नोटस् मुख्य कचेरींत दाखल झाल्याविना पुरें झालें असें म्हणतां येणार नाहीं. बँकेच्या एका शाखेऐवजी दुसऱ्या बँकेवर चेक काढलेले असले व क्रेडिट नोटस् मुख्य कचेरीला मिळाल्या नाहींत, तर लिक्विडेशनमध्यें गेलेल्या बँकेस रकम मिळाली असें धरलेंच जाणार नाहीं.

बँक ऑफ इंडियाचें असें म्हणणें कीं, मुख्य कचेरी व शाखा ही मिळून बँक होते. शाखेस रकम मिळाली, म्हणजे लिक्विडेशनमधील बँकेस मिळाली असाच अर्थ होतो. परंतु या प्रकरणांत लिक्विडेशनमधील बँक व तिची शाखा या दोन स्वतंत्र बँकाच समजल्या पाहिजेत असा ऑफिशिअल लिक्विडेटरचा आग्रह होता.

### "क्रेडिट नोटमुळें हक्क बदलत नाहींत"

शाखा ही मुख्य कचेरीची एजन्सी असली तरी बँकिंगच्या कांहीं विशिष्ट कामासाठीं त्या स्वतंत्र बँका समजल्या जातात हें खरें आहे. उदाहरणार्थ, ज्या शाखेवर चेक काढला असेल त्या शाखेवर त्याचे पैसे देण्याचें बंधन आहे, इतर शाखांवर नाहीं. एकाद्या निगोशिएबल इंस्ट्रुमेंटवर एकाच बँकेच्या वेगवेगळ्या शाखांच्या एंडॉर्समेंट असल्या तर डिसऑनरची नोटीस प्रत्येक शाखेस एकामागून एक दिली पाहिजे. प्रस्तुत प्रकरणांत तळोद शाखेवरचा चेक होता तो ऑनर करण्याची जबाबदारी तिचेवर होती. तेव्हां तळोद शाखा आणि लिक्विडेशनमधील बँक या दोन स्वतंत्र बँकाच, प्रस्तुत प्रकरणीं, समजल्या पाहिजेत. तसें समजलें म्हणजे एकाद्या चेकचें क्रेडिट मुख्य कचेरीनें स्वीकारल्याखेरीज किंवा तळोद शाखेनें दिलेलें क्रेडिट पत्करण्याची बंधनकारक व्यवस्था असून तळोद शाखेनें खातेदारास डेबिट टाकून मुख्य कचेरीस क्रेडिट टाकल्याखेरीज मुख्य कचेरीस रकम मिळाली असें धरलें जाणार नाहीं. शाखेनें दिलेलें क्रेडिट-मुख्य कचेरीनें स्वीकारलेंच पाहिजे. शाखेनें चेक पास केला आणि खातेदाराच्या नांवें रकम डेबिट टाकून मुख्य कचेरीला क्रेडिट दिलें, म्हणजे मुख्य कचेरीनें कलेक्शन केलें. तिला पैशाचा मोबदला मिळाला असेंच समजावयाचें.

प्रस्तुत प्रकरणांतील एका चेकची रकम तळोद शाखेनें खातेदाराच्या नांवें टाकून मुख्य कचेरीच्या खात्यास १६ फेब्रुवारी १९४७ रोजीं क्रेडिट दिलें होतें. सहाजिकच, लिक्विडेशनमध्यें गेलेली बँक म्हणजे नॅ. सि. बँक ही या रकमेपुरती बँक ऑफ इंडियाची ट्रस्टी बनली. दुसरे दोन चेक २१ फेब्रुवारी रोजींच खातेदारांच्या नांवें टाकून मुख्य कचेरीच्या खात्यास क्रेडिट केले, ते किती वाजता, हें पाहिलें पाहिजे. वाइंडिंग अपचा अर्ज त्या दिवशीं २ वाजून ४५ मिनिटांनीं दाखल करण्यांत आला. २-४५ पूर्वीं तळोद शाखेनें डेबिट-क्रेडिट नोंदी केल्या असत्या तर नॅ. सि. बँक ही त्यांच्या रकमाबाबत बँक ऑफ इंडियाची ट्रस्टी बनेल. क्रेडिट नोट मुख्य कचेरीस केव्हां मिळाली, हा प्रश्न महत्त्वाचा नाहीं. क्रेडिट नोट ही फक्त झालेली गोष्ट कळविण्याचें साधन होय; तिचेमुळें कोणतेहि नवे हक्क निर्माण होत नाहींत किंवा जुने जात नाहींत. तेव्हां या दोन चेक्सच्या रकमा २१ फेब्रुवारी १९४७ रोजीं नेमक्या किती वाजतां खातेदाराच्या नांवें टाकून मुख्य कचेरीस त्यांचें क्रेडिट दिलें हें उभय पक्षांनीं सिद्ध करावें.

### भांडवल उभारणीस परवानगी

१९४९ मध्यें कंट्रोलर ऑफ कॅपिटल इश्यूजनें ३२६ कंपन्यांचे ६३ कोटी, ४६ लक्ष रु. च्या भांडवलाचे अर्ज मंजूर केले. त्यांपैकीं ४१ कोटी, ७२ लक्षांचे १९३ अर्ज औद्योगिक कंपन्यांचे होते. ६१ कंपन्यांचे ८ कोटी, ७९ लक्ष रु. भांडवल उभारणीचे अर्ज नामंजूर करण्यांत आले. म्हणजे, मागणीपैकीं ८७·८% ला मंजुरी मिळाली. १९४८चे मानानें १९४९ मध्यें मंजुरीसाठी बरेच कमी अर्ज आले. १९४८ मध्यें ३७५ कंपन्यांना १२५ कोटी, ५७ लक्ष रुपये भांडवल उभारण्यास मंजुरी देण्यांत आली होती.

### अमेरिकन मोटार कंपनीची मजुरीवाढ

क्रायसलर मोटार कंपनीनें ताशीं १० सेंट ह्या प्रमाणें आपल्या कामगारांच्या पगारांत वाढ केली आहे. त्यामुळें कंपनीचा मजुरीचा वार्षिक खर्च २,५०,००,००० डॉलर्सनीं वाढेल.

## अवमूल्यनानंतरचें एक वर्ष व पुढच्या वर्षाबद्दल अपेक्षा

( भा. म. का. )

ब्रिटननें पौंडाचें अवमूल्यन केल्याला एक वर्ष पूर्ण झालें. या एका वर्षांत ब्रिटनच्या अर्थव्यवस्थेची स्थिरता दिसून येते. हें पुढील माहितीवरून स्पष्ट होण्यासारखें आहे. गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यांत स्टर्लिंग गटांतील देशाचा सुवर्ण व डॉलर्स यांचा तुटवडा पहिल्या तिमाहींत ( १९४९ च्या ) वर्षाला ३२८ दशलक्ष पौंडांपासून दुसऱ्या तिमाहींत वर्षाला ६२७ दशलक्ष पौंड इतका वाढला होता. सुवर्ण व डॉलर्स यांची शिल्लक फक्त ४०६ दशलक्ष पौंड होती. ब्रिटनमधल्या गेल्या एका वर्षांतील अनुभवावरून अंतर्गत मजुरीचा खर्च व उत्पादनाचा खर्च यांच्यांत वाढ होईल अशी जी शंका कांहीं वेळां व्यक्त केली जात होती ती खोटी ठरली आहे असें आढळून आलें आहे. अवमूल्यनानंतरच्या दहा महिन्यांत किरकोळ वस्तूंच्या सामान्य किमतींत दोन पॉइंट्स व मजुरीच्या बाबतींत एक पॉइंट इतकीच वाढ झाली., परंतु अवमूल्यनाच्या पूर्वी या दोनहि बाबतींत अनुक्रमें तीन व दोन पॉइंट्स् इतकी वाढ झाली होती. याप्रमाणें अवमूल्यन केल्यानंतर सामान्यपणें दिसून येणारे बेकारी व वाढत्या किंमती हे दोष ब्रिटनमध्यें दिसून आले नाहींत. अवमूल्यनानंतरच्या पहिल्या नऊ महिन्यांत स्टर्लिंग गटांतील देशांना महिन्याला १२ दशलक्ष डॉलर्स या प्रमाणांत सुवर्ण मिळूं शकत होतें, व १९५० च्या पहिल्या सहा महिन्यांतच डॉलर गटाशीं चालू व्यापारांत अनुकूल तफावत निर्माण होत होती. ही गोष्ट साध्य होण्याला घडलेलें एक कारण म्हणजे जुलै १९४९ च्या लंडन परिषदेंत ठरल्याप्रमाणें ब्रिटिश राष्ट्रकुटुंबांतील देशांनीं, वर्षाला एक हजार दशलक्ष डॉलर्स यापेक्षांहि जास्त प्रमाणांत डॉलर मालाच्या खरेदींत काटकसर केली आहे.

याच वेळीं स्टर्लिंग गटांतील देशांची डॉलर देशांकडे होणारी निर्गतहि वाढली आहे. अवमूल्यनापूर्वी ब्रिटनकडून अमेरिका व कॅनडा या देशांकडे दरमहा चार दशलक्ष डॉलर्स किंमतींचा माल निर्गत होत असे तो आतां १९५० च्या ऑगस्ट महिन्यांत सुमारें साडेसहा दशलक्ष डॉलर्स किंमतीचा माल निर्गत झाला आहे. अमेरिकेनें कांहीं प्रमाणांत वस्तूंचा सांठा करण्याचें धोरण स्वीकारल्यामुळें एकंदर स्टर्लिंग गटांतील देशांचें डॉलर्सचें उत्पन्न यापेक्षांहि जास्त प्रमाणांत वाढलें आहे. वस्तूंच्या किंमतींत झालेल्या वाढीमुळेंहि स्टर्लिंग गटाचें हें उत्पन्न वाढूं शकलें. तेव्हां अमेरिकेकडून जास्त प्रमाणांत खरेदी व मालाचे वाढते भाव या दोन गोष्टी अवमूल्यनामुळें निर्माण झालेल्या नव्हेत, तर त्या इतर कारणामुळें निर्माण झाल्या आहेत. खुद्द इंग्लंडमध्यें मजुरीच्या दरांत वाढ झाली नाहीं व आयातीच्या मालाचे दर अवमूल्यनापूर्वींच थोडेसें उतरले होते ही गोष्ट परिस्थिति सुधारण्याच्या दृष्टीनें महत्त्वाची होती. परंतु या सर्व गोष्टी याच प्रकारें पुढील वर्षी राहातीलच असें नाहीं. यामुळें आतां पुढील वर्षीचें म्हणजे १९५०–५१ चें कार्य जास्त कठीण झालें आहे. कोरियन युद्धांमुळें निर्माण झालेल्या वातावरणाचाहि या गोष्टींवर विरुद्ध दिशेनें परिणाम होणें संभवनीय आहे. कारण, लष्करी कार्यासाठी जास्त खर्च करण्याचें ब्रिटिश पार्लमेंटनें ठरविलें आहेच, व खुद्द अमेरिकेंतहि लष्करी खर्च वाढत्या प्रमाणांत होत आहेच. स्टर्लिंग गटांतील देशांची सुवर्ण व डॉलर शिल्लक वाढली असली तरी ती प्रत्यक्षांत युद्धपूर्वीच्या काळाच्या मानानें २५ टक्केच आहे.

अवमूल्यनाच्या या इतिहासापासून हिंदनेंहि सावधगिरी बाळगली पाहिजे. कारण जागतिक युद्धाला अनुकूल अशा वातावरणामुळें, वाढत्या किंमतीमुळें, व नैसर्गिक आपत्तीमुळें निर्माण झालेल्या अन्नतुटीमुळें हिंदची आर्थिक परिस्थिति अपेक्षेप्रमाणें समाधानकारक राहाणार नाहीं. गेलें एक वर्ष व्यापारी जमाखर्चाच्या दृष्टीनें थोडेसें समाधानकारक गेलें असलें तरी पुढील वर्षाची एकंदर परिस्थिति वस्तूंचे बाजारभाव आटोक्यांत राहण्यावर, उत्पादन वाढण्यावर, व त्याचवेळीं उत्पादनाचा खर्च शक्य तितका कमी राहण्यावरच अवलंबून राहील असें दिसतें. सारांश, अवमूल्यनाचें पहिलें वर्ष समाधानकारक गेलें असलें तरी पुढील वर्षासाठी नवीन अडचणी निर्माण झाल्या आहेत.

( अंशतः ब्रि. इ. याच्या आधारें )

## बँकेकडून येणें रकमेच्या वसुलीचा कायदेशीर प्रश्न

### मुंबई हायकोर्टाचा निवाडा

जोधपूर कमर्शिअल बँकेनें असोशिएटेड बँकिंग कॉर्पोरेशन ( ए. बी. सी. बँक ) कडे एकूण ३१,२१९ रु. १० आ. चे तीन चेक व एक हुंडी वसुलीसाठी पाठविली होती. वसुली करून ती रक्कम ए. बी. सी. बँकेच्या पे स्लिपच्या स्वरूपांत जोधपूर बँकेकडे धाडण्यांत यावी, अशी स्पष्ट सूचना देण्यांत आली होती. त्याप्रमाणें ए. बी. सी. बँकेनें वसुली करून चार स्लिपा जोधपूर बँककडे पाठविल्या, त्या जोधपूर बँकेनें रिझर्व्ह बँकेंत भरल्या. रिझर्व्ह बँक त्यांची रक्कम ए. बी. सी. बँकेकडून वसूल करूं शकली नाहीं, म्हणून जोधपूर बँकेनें त्या स्लिपा ए. बी. सी. बँकेकडे पाठवल्या. परंतु त्या बँकेनें पैसे देण्याचें नाकारलें. दुसऱ्याच दिवशीं ए. बी. सी. बँक गुंडाळण्यांत यावी असा हायकोर्टाचा हुकूम झाला. जोधपूर बँकेचे वतीनें ए. बी. सी. बँकेनें जमा केलेल्या रकमेपुरती ए. बी. सी. बँक हीं ट्रस्टी बनली किंवा नाहीं, हा येथें महत्त्वाचा प्रश्न उपस्थित झाला. न्या. तेंडोलकरांनीं हायकोर्टांत जोधपूर बँकेविरुद्ध निकाल दिला होता, त्यावर बँकेनें अपील केलें त्याचाहि निवाडा आतां बँकेविरुद्ध झाला आहे आणि अपिलाचा खर्चहि तिला सोसावा लागला आहे.

**वसूल केलेल्या पैशांचें स्वरूप 'ट्रस्ट'चें होतें काय ?**

" एकाद्यानें बँकेस कांहीं विशिष्ट रक्कम त्याच्या वतीनें वसूल करावयास सांगितली आणि त्या रकमेचा कांहीं विनियोग न करतां स्वतंत्र राखण्याविषयीं तिला सूचना दिली आणि मागणीप्रमाणें परत करण्याबद्दल बँकेला अट घातली, तरच ट्रस्ट निर्माण होऊं शकतो. अशा बाबतींत बँकेला त्या पैशाला हात लावतां येत नाहीं. परंतु, एकाद्यानें बँकेस त्याच्या वतीनें पैसे वसूल करून मागणीबरहुकूम परत देण्याविषयीं फक्त सूचना दिली तर त्या पैशाबाबत ट्रस्ट निर्माण होत नाहीं. बँक व तिचा खातेदार ह्यांचेमधील नातें साधें देणेकरी व घेणेकरी असें होईल आणि बँक वसूल केलेले पैसे वापरूं शकेल. प्रस्तुत प्रकरणांत जोधपूर बँक आणि ए. बी. सी. बँक ह्यांचेमधील नातें अशाच स्वरूपाचें होतें. ए. बी. सी. बँकेनें वसूल केलेली रक्कम ही जोधपूर बँकेसाठी ट्रस्ट म्हणून ठेवलेली नव्हती. सबब, ए. बी. सी. बँकेच्या लिक्विडेशनमध्यें जोधपूर बँकेस अग्रहक्क मिळणार नाहीं " वरील प्रमाणें न्या. छगला व न्या. भगवति ह्यांनीं निवाडा करून अपील फेटाळलें.

### दि बॉबे प्रॉ. को. बँक लि.

वरील बँकेची व्यवस्था नव्या घटनेप्रमाणें आतां चालू आहे. अहवालाचे वर्षी बँकेचे २३,२७९ नवे शेअर्स खपून वसूल भांडवलांत ११,६३,९५० रु. ची भर पडली. प्रत्येक शेअरच्या पोटीं वाढाव्याचे १० रु. मिळाले, ते रिझर्व्ह फंडाकडे वर्ग करण्यांत आले. मुंबई सरकारनें ३२,००० भाग वाढावा न देता, दर्शनी किंमतीस घेतले त्याचे १६,००,००० रु. आले. अशा रीतीनें, वसूल भांडवलाची रक्कम ४८,२६,२०० रु. झाली. नव्या घटनेप्रमाणें, बँकेच्या बोर्डावर १२ डायरेक्टर काम करीत आहेत. बँकेकडील ठेवी वाढत आहेत आणि कापड-सुताचे तारणावरील कर्जें कमी झालीं आहेत. त्यामुळें, ह्या वाटपासाठीं घेतलेलें सरकारचें २ कोटींचें कर्ज बहुतेक सर्व फिटलें आहे. सहकारी सोसायट्यांस दिलेल्या कर्जांत १ कोटी, ५४ लाखांची घट झाली आहे. बँकेच्या शाखांची संख्या ३ नें वाढून ती ५९ झाली. आणखी शाखांस मागणी आहेच. ठेवींत वाढ व कर्जांत घट ह्यांमुळें सरकारी रोख्यांतील गुंतवणूक १ कोटी, २१ लाखांनीं वाढून ती ५ कोटी, १४ लक्ष रुपयांवर गेली. बँकेचा एकूण ताळेबंद १० कोटी, ४४ लक्ष रुपयांचा आहे. अहवालाचे वर्षी बँकेस ४,५५,५६७ रु. नफा झाला. ४% डिव्हिडंड + १% बोनसला १,५३,१७० रु. लागले. ( चेअरमनः आर. जी. सरय्या. ऑ. मॅनेजिंग डायरेक्टरः व्ही. पी. वर्दे. )

### दि सारस्वत को. बँक लि.

वरील बँकेचा वार्षिक अहवाल नेहमींप्रमाणेंच आदर्श असा आहे. त्यांत माहितीचे जेवढे तुलनात्मक तक्ते दिले आहेत, तेवढे इतर कोणत्याहि बँकेच्या अहवालांत आढळत नाहींत. हे तक्ते व त्यांच्या सोबतचा तपशील ह्यांवरून बँकेच्या उत्कृष्ट व उपयुक्त कारभाराची उत्तम कल्पना येते. गेल्या वर्षी बँकेकडील ठेवी ८८½ लक्ष रु. वरून ९९ लक्ष रु. वर गेल्या ही एकच गोष्ट तिच्या प्रगतीचें स्वरूप दाखविण्यास पुरेशी आहे. अहवालाचे वर्षी बँकेकडून २२५ अर्जदारांनीं मिळून ३,२५,८५० रु. चीं कर्जें घेतली. त्यापैकीं १,३१,८५० रु. घर बांधणी किंवा दुरुस्ती ह्यांसाठीं होतीं. एकूण २३,०४,१८० रु चे ओव्हर ड्रॉफ्ट मंजूर करण्यांत आले. बँकेचीं कर्जें, कॅश क्रेडिटस व ओव्हरड्राफ्ट ह्यांपैकीं सुमारें ९३% तारणावर असून बाकीचीं जामिनकीवर आहेत. बँकेस ५४,२८७ रु. निव्वळ नफा होऊन ६¼% डिव्हिडंडसाठीं त्यापैकीं २७,००० रु. लागतील. अहवालास खेळतें भांडवल, ठेवी, गुंतवणूक, कर्जें, शेअर भांडवल व रिझर्व्ह हीं दाखवणारा उद्‌बोधक ग्राफ जोडला आहे. व्यवस्थापक मंडळांतील १२ सभासदांपैकीं १० पदवीधर असून त्यांतच श्री. चंपा आर. लिमये बी. ए. ह्यांचा समावेश आहे. बँकेच्या दादर, माहीम व बेळगांव येथें शाखा आहेत. ( चेअरमनः वा. पुं. वर्दे, बी. कॉम. सेक्रेटरी : एस. व्ही. रंझागिरी, बी. कॉम. )

### दि महाड को. अर्बन बँक लि.

७२,५७५ रु. शेअर भांडवल, २१,५७६ रु. रिझर्व्ह फंड, ३६,४६० रु. इतर फंड, ६,१८,४७४ रु. ठेवी, ४,८६,३४४ रु. इनव्हेस्टमेंटस्, १,४७,६७० रु. कर्जें, ७,७७,८५३ रु. खेळतें भांडवल, असे ह्या बँकेच्या ताळेबंदांतील प्रमुख आंकडे आहेत. यावरून बँकेच्या सुस्थितीची कल्पना येईल. हुंडीवरील कर्जाचा व्यवहार वाढत आहे. अहवालाचे वर्षी निव्वळ नफा ११,३३० रु. झाला. ५% डिव्हिडंडला ३,५१४ रु. लागले. ( चेअरमनः द. न. वैद्य, बी. ए. एलएल. बी.; मॅनेजरः वि. गो. मेहता, बी. ए. एलएल. बी.; मॅनेजरः मा. गो. चारप, बी. एससी. ऑनर्स )

### सातारा जिल्हा को. लँड मॉर्गेज लि.

वरील बँकेचें शेअर भांडवल ४८,६३५ रु. असून रिझर्व्ह फंड १५,००० रु. आहे. खेळतें भांडवल ५,५१,५९० रु. असून सभासदांकडे येणें ५,००,६०७ रु. आहे. अहवालाचे वर्षी १,२२,६२५ रु. चीं नवीं कर्जें देण्यांत आलीं. द. सातारा जिल्ह्यांतील दोन तालुक्यांतील कार्यक्षेत्र बँकेस नव्यानें मिळालें. सांगली येथें शाखा ऑफिस उघडण्यांत आलें आहे. साल अखेरीच्या साडेतीन महिन्यांत ह्या शाखेमध्यें जत, मिरज, तासगांव व वाळवा ह्या तालुक्यांतून ८०,००० रु. चे ३० अर्ज दाखल झाले आहेत. कर्ज निवारण कायदा, टेनन्सी कायदा, सावकारी नियंत्रण कायदा इ. च्या अम्मलबजावणीच्या परिणामाची उद्‌बोधक चर्चा रिपोर्टांत केलेली आढळते. ( चेअरमनः आण्णाप्पा नारायण कल्याणी, मॅनेजरः एम्. एस्. पुटाणी. )

### शेतकरी सहकारी संघ., लि. कोल्हापूर

संघाचे सभासदांनीं व शेतकी सहकारी संस्थांचे सभासदांनीं आपले शेतांत तयार केलेल्या मालाची ( गूळ, शेंग, तंबाखू, हळद, मिरची, इ. ) विक्री कसोशीनें व योग्य भावांत करणें व शेतीचे उपयोगी जिन्नस खरेदी करून अगर तयार करून पुरविणें हें ह्या संस्थेचें ध्येय आहे.–वर्षअखेर: सभासदसंख्या २१९० आहे. वसूल भांडवल १,५२,९०० रु. असून रिझर्व्ह फंड ५२,३४० रु. आहे आणि इतर फंड ७२,८४४ रु. चे आहेत. एकूण ताळेबंद १२,६४,४८७ रु. चा आहे. मालाचे ठेवणीसाठीं संघानें १४ गोडाऊन्स कोल्हापूर येथें घेतलीं आहेत. शाखेवर व डेपोवर जरूरीप्रमाणें आणखी गोडाऊन्स आहेतच. संघाच्या जयसिंगपूर, इचलकरंजी, वडगांव, हुपरी, बांबवडे, गारगोटी व गडहिंग्लज येथें शाखा आहेत. कोल्हापूर जिल्ह्यांतील साखरेची होलसेल डिस्ट्रिब्यूशनशिप संघास मिळली असून सिमेंटचें वांटपहि संघाकडे आहे. शाखांकडे ग्रामीण धान्यवाटपाची रेशनिंगचीं दुकानें आहेत. अहवालाचे वर्षी संघास ५६,२०५ रु. नफा झाला. ६¼% डिव्हिडंडला ९२७५ रु. लागले. ( प्रेसिडेंटः एस. एल. बेनाडीकर क्षात्र जगद्‌गुरु महाराज. मॅनेजिंग डायरेक्टरः ता. गो. मोहिते. )

### सातारा जिल्हा औद्योगिक सहकारी मंडळ लि, कराड

वरील मंडळानें अहवालाचे वर्षी सरकारी धाऊक सूतवाटपाचेंच काम केलें असून त्याशिवाय मंडळाच्या जबाबदारीवर सूतपुरवठा, सोसायट्यांकडील तयार मालाची विक्री, विणकरांना लागणाऱ्या साहित्याची खरेदी–विक्री, सभासदांची जांगड माल विक्री, कर्ज, वगैरे कामें शक्य तेवढीं केलीं आहेत. कस्तुरबा मातंग रोप मेकिंग सोसायटीच्या वाखाच्या दोन वॅगिनी माल विक्री केला आहे. "उत्पादक सोसायट्यांची कर्जाची तातडीची गरज लक्षांत घेऊन कर्जें तावडतोब मंजूर केलेलीं आहेत. त्यांनीं मात्र या बाबतींत निव्वळ कर्जें मिळविण्यापेक्षा अधिक कोणत्याहि व्यवहारास हात घातला नाहीं." अहवालाचे वर्षी ९,७१७ रु. नफा झाला आहे. ( चेअरमनः ग. ए. तारळेकर, एलएल. बी., मॅनेजरः वि. मा. रोकडे )

### मुंबई प्रां. सहकारी परिषद

वरील परिषदेचें येतें अधिवेशन धारवाड येथें दि. ४ व ५ नोव्हेंबर १९५० रोजीं भरविण्याचें प्रां. स. इंस्टिट्यूटनें ठरविलें आहे. रिझर्व्ह बँकेचे डायरेक्टर श्री. रामराव माधवराव देशमुख हे परिषदेचें अध्यक्षस्थान स्वीकारणार आहेत.

## बँकेंतील नवा खातेदार

### चांगली ओळख घेण्याचें कायदेशीर महत्त्व

संपादक अर्थ, यांस स. न वि. वि.

वरील मथळयाचा लेख आपल्या साप्ताहिकाच्या दि. २८ जून, १९५० चे अंकांत प्रसिद्ध झाला आहे. त्यांतील सूचना किती महत्वाच्या आहेत ह्याचा अनुभव नुकताच आला. बिन ओळखीच्या माणसास खातें उघडूं देण्यांतील धोका त्यामुळें स्पष्ट झाला. आपल्या साप्ताहिकांत बँकिंगच्या धंद्यामधील लोकांसाठी उपयुक्त सूचना येत असतात. त्यांचेकडे बँकेच्या जबाबदार अधिकाऱ्यांनीं आपल्या नोकरवर्गाचें लक्ष वेधलें तर फार बरें होईल.

एका बँकेनें एका बिन-ओळखीच्या माणसास खातें उघडूं दिलें. ह्या खातेदारानें दुसऱ्या एका बँकेच्या ड्राफ्ट्स बुकांतील चोरलेला व खोटी सही केलेला मोठ्या रकमेचा चेक वसुलीसाठी आपल्या ह्या नव्या खात्यांत भरला. हा ड्राफ्ट ज्या बँकेवर होता, तिचेकडे वसुलीसाठी पाठविण्यांत आला आणि तो पास होऊन खातेदाराच्या म्हणजे कलेक्टिंग बँकेंतील खात्यांत रक्कम जमा केली गेली. ती मोठी रक्कम त्यानें तात्काळ काढून घेतली. ज्या बँकेवर ड्राफ्ट काढलेला होता, तिनें मूळ बँकेच्या नांवें खर्च टाकली. ती नोंद यथाकाळ तिच्या ध्यानांत आली आणि चौकशीस तेथून प्रारंभ झाला. कलेक्टिंग बँकेंत खातें उघडतांना खातेदारानें दिलेलें नांव व त्याचा पत्ता हीं दोन्हीं खोटीं असल्याचें आढळून आलें! कलेक्शन करणारी बँक ही चोराची एजंट बनते, हें सहजीं लक्षांत येत नाहीं. आपल्या लेखांतील स्पष्ट सूचनांप्रमाणें खातेदारास खातें उघडूं देतांना योग्य दक्षता घेतली गेली असती तर ही आपत्ती टळली असती.

पुणें
दि. २१।९।५० आपला
" सरळमार्गी "

---

### दि पूना अर्बन कोऑपरेटिव्ह बँक लि.

ह्या संस्थेची वार्षिक साधारण सभा रविवार ता. २४ सप्टेंबर १९५० रोजीं होऊन तीमध्यें निवडणुकीचा निकाल खालीलप्रमाणें झाला.

कार्यकारी मंडळ

१ मा. दिगंबर विष्णु इनामदार ( चेअरमन )
२ „ नरहर भाऊराव कुलकर्णी.
३ „ दिनकर शंकर जोशी.
४ „ महादेव भाऊराव शेळके.
५ „ व्यंकटेश नागेश पोळ.
६ „ रणछोड पांडुरंग भोंडे, वकील
७ „ देविदास त्र्यंबक विसाळ.
८ „ रघुनाथ भाऊशेट शिवरकर.
९ „ जनार्दन शंकर मेढेकर.

हिशेब तपासनीस

१ मा. शरच्चंद्र सीताराम मरकळे.
२ „ लक्ष्मण धर्माजी ढुंबरे.

( " अर्था " च्या दि. २० सप्टेंबरच्या अंकांत श्री. मो. ना. पाटसकर ह्यांचें नांव चेअरमन म्हणून चुकीनें छापलें गेलें होतें. )


मशिन्स् रोखीनें व हप्त्यानें विकत मिळतात.



पेडणेकर आणि कं. लिमिटेड
शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी
१७२, गिरगांव रोड, मुंबई नं. ४.
फोन नं.-२१७३८

भोर स्टेट बँक लि.
[ स्थापना : १९४४ ]
मुख्य कचेरी:-भोर, जि. पुणें.
शाखा:-पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ६९,६०० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स
श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. — श्री. बा. ग. धंदुके.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.
दराबाबत समक्ष चौकशी करावी
पुणें कचेरी:-बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबा नजिक. फोन नं. २५७६.
अधिक माहितीसाठी लिहा.
रा. गो. आगाशे, बी. ए. ( ऑ. )
मॅनेजर.




दि माणिक सोप वर्क्स, कराड (सातार


हें पत्र पुणें, पेट भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं ' दुर्गाधिवास ', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.